
फ्लोरेन्स नाइटिंगेल

लेखिका : शॅनॉन झेमलिका
रेखाचित्रं : निकोलन डेबॉन

मराठी अनुवाद : नीलांबरी



फ्लोरेन्स नाइटिंगेल

लेखिका : शॅनॉन झेमलिका
रेखाचित्रं : निकोलन डेबॉन
मराठी अनुवाद : नीलांबरी





एक आगळीवेगळी मुलगी
इंग्लंड, १८२६

फ्लोनं आपल्या बाहुलीच्या हाताभोवती एक स्लिंग बांधली.

ती बिचारी बाहुली पडली होती.

दुस-या बाहुलीला बँडेज हवं होतं.

फ्लोसाठी दिवसभर व्यग्र होती.

तिच्या सगळ्या १८ बाहुल्यांना नर्सिंगची गरज होती.

त्यांना बरं करायला तिची मदत लागत होती.

इंग्लंडमधल्या बहुतेक मुलींकडे इतक्या बाहुल्या नव्हत्या.

पण सहा वर्षांची फ्लोरेन्स नाईटिंगेल मात्र इतर मुलींसारखी नव्हती.

तिचं कुटुंब श्रीमंत होतं.

नाईटिंगेल्सकडे दोन भव्यं प्रासाद आणि चिक्कार जमीन होती.

त्यांचं काम करायला घरात नोकरचाकर होते.

फ्लो आणि तिची बहीण पार्थीकडे शिंगरु आणि उंची पोशाख होते.

त्यांच्याकडे खूप बाहुल्या आणि हवी ती खेळणी होती.

फ्लो जसजशी मोठी होऊ लागली, तसं तिच्या लक्षात आलं, अनेक लोक
नाईटिंगेल्ससारखं उंची जिणं जगत नाहीत.

बहुतेक लोक खूप कष्ट करतात.

ते छोट्या घरात दाटीवाटीनं रहातात

फ्लोची आई तिला काहीवेळा जवळच्या गरीब कुटुंबांकडे घेऊन जायची.

पण ब-याच वेळा, नाईटिंगेल्स स्वत:तच मश्गुल असायचे.

वे पार्टियों और संगीत कार्यक्रमों में जाते थे.


ते पार्ट्यांना आणि संगीताच्या जलशांना जायचे.

ते पत्रं लिहायचे आणि पुस्तकं वाचायचे.

ते सगळे आनंदात होते – फ्लो सोडून.

फक्त एंजॉय करण्यापलीकडे तिला काहीतरी करायचं होतं.

तिला लोकांना मदत करायची होती.



फ्लोला भोवताली दिसणा-या लोकांच्या

त्रासाबद्दल काळजी वाटायला लागली.

ती भेटायची ते गरीब लोक अनेकदा आजारी असायचे.

मग, ती नऊ वर्षांची झाली तेव्हा तिच्या कुटुंबाज आजार पसरला.

तिचा चुलतभाऊ बोनी खूप आजारी पडला

त्याच्या आजारावर डॉक्टरांचा उपाय चालेना



बोनी धैर्य दाखवत होता, पण त्याला खूप त्रास होत होता.

अखेरीस तो मरण पावला.

जगात खूप आजार आणि वेदना आहेत, फ्लो विचार करत होती.

तिला यासाठी काय मदत करता येईल?

आपल्या आईवडिलांना, आपण लोकांना मदत करण्यात आयुष्य

घालवावं अशी अपेक्षा नसल्याचं तिला ठाऊक होतं.

तिच्या आईनं जे केलं तिनं करावं अशी त्यांची अपेक्षा होती.

म्हणजे, मोठी झाल्यावर, तिनं एका श्रीमंत माणसाशी लग्न करावं,

मुलांना जन्म देऊन त्यांना वाढवावं.

तसंच एका अलिशान घरात राहून आनंदात आयुष्य काढावं.

फ्लोचं आपल्या कुटुंबावर प्रेम होतं.

पण आयुष्यभर केवळ चैन करण्याची कल्पना तिला मान्यच नव्हती.

कित्येक लोक वेदनेनं तळमळत होते.

फ्लो १६ वर्षांची असताना, वेगळंच काहीतरी घडलं.

आपल्या हिवाळ्यात रहाण्याच्या घरात दोन झाडांखाली ती बसली होती.

एकटं शांत बसायला तिला ती जागा फार आवडायची.

अचानक, आपण तिथे एकटे नाही असं तिला जाणवलं.

एक गूढ आवाज तिला ऐकू आला.


त्यानं तिला सेवा करायची आज्ञा दिली.

आपण देवाचा आवाज ऐकला अशी फ्लोची खात्री पटली.

देवानं आपल्याला काय करायला सांगितलं ते तिला कळलं नव्हतं.

पण एक गोष्ट मात्र तिला ठाऊक होती,

तिचे आईवडिल सांगत होते त्या मार्गानं जगणं तिला शक्य नव्हतं.





पुढची काही वर्षं तिनं देवाची सेवा कशी करायची यावर विचार केला.

सर्वात महत्वाचं म्हणजे, तिला आजारी लोकांना मदत करायची होती.

नाईटिंगेल्स जर आजारी पडले तर ते घरी उबदार बिछान्यात पडून रहायचे.

नोकर त्यांची शुश्रूषा करायचे.

पण गरीब लोकांना आजारी पडल्यावर इस्पितळात जावं लागायचं.

१८४०च्या सुमारास सगळी इस्पितळं अस्वच्छ असायची.

आजारी माणसांचा आजार तिथे अजूनच वाढायचा.

काळजीच्या अभावी, अनेकजण मरण पावायचे.

फ्लोरेन्सनं त्यांना मदत करायचं ठरवलं.

इस्पितळात नर्सचं काम करायचं तिनं ठरवलं.

फक्त ते कसं साध्य करायचं ते ठरवायचं होतं.





लढा
डिसेंबर १८४५

फॅनी नाईटिंगेलनं पाय जमिनीवर आदळले.

पार्थी सोफ्यावर आदळली आणि रडायला लागली.

फ्लोरेन्सनं आपली आई आणि बहीण यांना तिला नर्सिंग शिकायचं आहे असं सांगितलं.

त्यांना ते सहन होणं शक्य नव्हतं.

अशी गोष्ट सुचवताना फ्लोरेन्सचं डोकं ठिकाणावर नसणार हे नक्की.

इस्पितळं हा भयंकर प्रकार असतो. फॅनीनं फ्लोरेन्सला आठवण करुन दिली.

नर्सेस या प्रतिष्ठित बायका नसतात.

त्यातल्या ब-याचजणी दारु पितात.

याहून भयंकर म्हणजे, त्यांना त्यांच्या रुग्णांना आंघोळ घालावी

लागते. त्यांचे कपडे बदलावे लागतात.


आणि बरेच रुग्ण हे पुरुष असतात!

फ्लोरेन्सच्या वडिलांनाही धक्का बसला.

आपली मुलगी हुशार आणि चटपटीत असावी अशा रीतीनं त्यांनी
तिला वाढवलं होतं.

तिला चांगला नवरा मिळावा या दृष्टीनं तिला वाढवलं होतं.

ती अशी कृतघ्न कशी असू शकते?



फ्लोरेन्स आत्तापर्यंतच्या आयुष्यात इतकी दु:खी कधीच
नव्हती.


ती आपल्या कुटुंबियांच्या शब्दाबाहेर कधीच जाऊ शकत
नव्हती.

ते योग्य ठरलं नसतं.

तरीही तिनं हार मानली नाही.

तिनं इस्पितळांबद्दल वाचन सुरु केलं.

आपलं काम गुप्त रहावं यासाठी ती सूर्योदयाआधी वाचायची.



अशी सुमारे पाच वर्षं गेली.

फ्लोरेन्स २९ वर्षाची झाली होती आणि कधी नव्हे इतकी गूढ वागत होती.

मग ती दोन मैत्रिणींबरोबर ट्रीपला गेली.

जर्मनीमध्ये तिनं एक नर्सिंग स्कूल पाहिलं.

कैसरवर्थ या ठिकाणी कित्येक स्त्रिया आजारी

लोकांची काळजी घेण्याचं शिक्षण घेत होत्या.

त्या सर्व सभ्य स्त्रिया होत्या असं फ्लोरेन्सच्या लक्षात आलं.

त्यांना भेटून उपयोगी पडेल असं आयुष्य जगण्याची

तिची इच्छा परत बळावली.



परत घरी आल्यावर, फ्लोरेन्सनं एक कठोर निर्णय घेतला.

तिच्या कुटंबियांची अवज्ञा करणं चुकीचं होतं.

पण त्यांच्या आनंदासाठी तिनं सगळं आयुष्य देणं हे त्याहूनही चुकीचं होतं.

तिनं कैसरवर्थला जाण्याचा निर्णय घेतला.

फॅनी आणि पार्थीला या बातमीनं राग आला.

पण फ्लोरेन्सनं आपला निर्णय बदलला नाही.

१८५१ मध्ये तिनं तीन महिन्यांचं प्रशिक्षण घेतलं.

जखमांवर मलमपट्टी करायला आणि वेदनेनं तळमळणा-या लोकांना शांत करायला ती शिकली.

नंतर, लंडनला परत आल्यावर स्त्रियांसाठी इस्पितळ चालवायची नोकरी तिला मिळाली.

१८५३ मध्ये तिनं काम सुरु केलं.

अखेरीस, ती आजारी माणसांची सेवा करत होती! फ्लोरेन्सला त्या

इस्पितळातल्या महिलांची शुश्रूषा करायला आवडत होतं.

पण लवकरच तिला भविष्याची चिंता वाटायला लागली.

लोकांना मदत करायला ती अजून काय करु शकेल?



1854 के अगस्त में फ्लोरेंस को अपने प्रश्न का उत्तर मिला.

१८५४च्या ऑगस्टमध्ये, फ्लोरेन्सला तिच्या प्रश्नाचं उत्तर सापडलं.

इंग्लंडं रशियाविरुध्द युध्द पुकारलं.

हजारो सैनिक जखमी झाले.

इतर असंख्य सैनिक आजारी पडले.

लष्करात त्यांची काळजी घ्यायला माणसांची गरज होती.

फ्लोरेन्सचा मित्र सिडने हर्बर्ट शासनासाठी काम करत होता.

तिला त्यानं मदतीची याचना केली.

नर्सेसच्या एका गटाबरोबर प्रमुख म्हणून ती काम करेल का?

ते काम कठीण होतं.


घरापासून अत्यंत दूरच्या प्रदेशात, तुर्कस्तानात तिला जायला

लागणार होतं.

आपल्याला हेच काम करायचं आहे अशी फ्लोरेन्सला खात्री पटलेली होती.

तिनं नर्सेसना गोळा केलं आणि आपलं सामान बांधलं.

ती युध्दभूमीवर तिच्या कामासाठी निघाली.





युध्दातली नर्स
स्कुटारी, तुर्कस्तान
नोव्हेंबर ५, १८५४

फ्लोरेन्सचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता.

बराक इस्पितळात नर्सेसची गरज असल्याचं तिला कळलं होतं.

पण जे समोर दिसत होतं ते दृश्य तिला अपेक्षित नव्हतं.

त्या इस्पितळात पलंगच नव्हते.

जखमी सैनिक जमिनीवर पडले होते.

त्यांना उब देणारी पांघरुणं नव्हती.

जखमांवर मलमपट्टी करायला स्वच्छ पट्ट्या नव्हत्या,

औषधांचा प्रचंड तुटवडा होता.

फिर फ्लोरेंस ने और भी बुरी खबरें सुनीं.

त्यात फ्लोरेन्सला अजूनच वाईट बातमी कळली.

डॉक्टरांना तिची मदत नको होती.

लष्करात त्याआधी महिला नर्सेस नव्हत्या.

एका श्रीमंत महिलेनं लोकांवर कसे उपचार करावेत हे


आपल्याला शिकवावं असं डॉक्टरांना वाटत नव्हतं.

फ्लोरेन्स आणि तिच्या सहकारी नर्सेसना लोकांचं वेदनेमुळे

होणारं आक्रंदन ऐकवत नव्हतं.

पण त्यांना काहीच करता येत नव्हतं.

त्यांनी मग शर्ट शिवणं आणि बँडेजेस तयार करणं ही कामं सुरु केली.



९ नोव्हेंबरला हे सगळं बदललं.

जहाजं भरभरुन स्कुटारीत माणसं दाखल झाली.

प्रत्येक जहाजात जखमी, आजारी माणसं होती.

डॉक्टरांना आता नर्सेस या महिला आहेत वगैरे विचार करायला वेळच नव्हता.

प्रत्येकाची मदत गरजेची होती.

फ्लोरेन्स आणि इतर नर्सेस कामाला लागल्या.

त्यांनी सैनिकांना स्वच्छ करुन जखमांवर मलमपट्टी केली.

पोत्यांमध्ये भुस्सा भरुन पलंग तयार केले.

रात्र रात्र फ्लोरेन्स जागी असायची.

पलंगांच्या रांगांमधून हातात दिवा घेऊन ती देखरेख करायची.

सैनिकांची जितकी सेवा करता येईल तितकी ती करत होती.



नर्सचं काम करत नसेल तेव्हा फ्लोरेन्स प्रश्न विचारायची.

इस्पितळं हा इतका भयंकर प्रकार का आहे ते तिला कळायला लागलं होतं.

लष्कराकडे साधनसामुग्रीच्या खरेदीसाठी पैसे होते.

शपण ती सामुग्री कोणी खरेदी करायची यावर एकमत होत नव्हतं.

जर अधिका-यानं त्यावर चुकीनं पैसे खर्च केले तर त्याला समस्या येणार होत्या.

फ्लोरेन्सकडे सामुग्री खरेदी करायला स्वतःचे पैसे होते.

तिला पुढे होणा-या त्रासाची पर्वा नव्हती.

मग तिनं स्वतःच सामुग्री खरेदी केली.

तिनं शर्टस, मोजे, काटेचमचे आणि साबण खरेदी केले.





फ्लोरेन्सनं अशा प्रकारे इतर समस्याही सोडवल्या.

कोणीच जमीन आणि भिंती स्वच्छ करत नव्हतं.

रक्त आणि कचरा यांचा सर्वत्र थर जमला होता.

फ्लोरेन्सनं स्वत: खराटे आणून घाण खरवडून काढायला सुरुवात केली.

नर्सेसनी मिळून इस्पितळ स्वच्छ केलं.

सैनिकांचे कपडे धुवायला कोणी तयार नव्हतं.

फ्लोरेन्सनं सैनिकांच्या बायकांना हे काम करायला वेतन द्यायला सुरुवात केली.

यथावकाश, बराक इस्पितळ जरा नीटनेटकं झालं.

याबद्दल कोणाचे आभार मानायचे ते सैनिकांना ठाऊक होतं – फ्लोरेन्स नाईटिंगेल.

ती त्यांच्या पलंगाच्या जवळून गेली तर तिच्या सावलीबद्दलही

त्यांना प्रेम वाटायचं.



फ्लोरेन्सनं जसजशी जबाबदारीनं काम पार पाडली, तसा डॉक्टर्सचा तिच्यावर विश्वास बसला.

पण सगळ्यांनाच ती आवडत होती असं नाही.

इस्पितळ चालवणारे लष्करी अधिकारी तिच्यामुळे लज्जित झाले होते.

ते आपलं काम किती घाणेरडं करत होते हे तिच्यामुळे लोकांसमोर आलं होतं.

काही नर्सेसना देखील ती आवडत नव्हती.

ती सैनिकांशी दयाळूपणे वागत असली तरी नर्सेसबरोबर शिस्तीनं वागायची.

आपल्याबद्दल इतर काय विचार करतात यापेक्षा तिला आपलं काम

खूप जास्त महत्वाचं वाटत होतं.

१८५५च्या मे मध्ये फ्लोरेन्सनं लष्कराच्या इतर इस्पितळांना भेट दिली.

ती इस्पितळं अस्वच्छ आणि वाईट पध्दतीत चालवलेली होती.

फ्लोरेन्सकडे अनेक कल्पना होत्या.

स्कुटारीच्या इस्पितळाप्रमाणेच ती हे इस्पितळही चांगलं करु शकत होती.



पण ते काम सुरु करण्याआधी ती तापानं फणफणली.

ती जवळपास मृत्यूच्या दारातून परत आली.

मग ती स्कुटारीला परतली.

तिला दोन आठवडे विश्रांती घ्यावी लागली.

पण ती इंग्लंडमध्ये आपल्या घरी परतली नाही.

खूप काम बाकी होतं.

फ्लोरेन्स तिथल्या समस्या सोडवत राहिली.

सैनिक उपचारांमुळे बरे झाले तेव्हा त्यांनी करण्याजोगं असं काही काम नव्हतं.

त्यामुळे बरेचजण बारमध्ये जाऊन दारु प्यायचे.

दारुमुळे ते परत आजारी पडायचे.


फ्लोरेन्स सैनिकांसाठी शाळा सुरु करावी या हेतून शिक्षक शोधले.

मग दारु पिण्याऐवजी ते वर्गात जाऊन शिकायला लागले.

ते गायला शिकले.

त्यांनी नाटकं बसवली आणि फूटबॉलच्या स्पर्धा आयोजित केल्या.





१८५६ मध्ये इंग्लंड आणि रशिया यांच्यात शांतताकरार झाला.

क्रिमिअन युध्द संपलं.

स्कुटारीतल्या जखमी माणसांवर इलाज झाल्यावर ते सगळे घरी गेले.

जुलैपर्यंत सगळे सैनिक घरी गेलेले होते.

फ्लोरेन्सही आपल्या घरी परतली.

स्त्रिया उत्तम नर्सेस होऊ शकतात हे तिनं सिध्द केलं होतं.

तिनं हजारो सैनिकांना मदत केली.

पण तरीही तिला पराभूतच वाटत होतं.

तिच्या मनात त्या हजारो सैनिकांचेच विचार येत होते

जे लष्करी इस्पितळात मरण पावले.

अशा अस्वच्छ इस्पितळांमध्ये लोक मरत रहाणार का?

ती हे चित्र बदलण्यासाठी काय करु शकेल?



काम चालूच राहिलं
इंग्लंड, ऑगस्ट १८५६

फ्लोरेन्स तिच्या टेबलापाशी हैराण होऊन बसली होती.

इतकी पत्रं आली होती!

पार्थी ती पत्रं एकामागून एक मोठ्यांदा वाचत होती.

एका महिलेला नोकरी हवी होती.

एका पुरुषाला फ्लोरेन्ससोबत लग्न करायचं होतं.

इंग्लंडमध्ये प्रत्येकाला तिनं केलेल्या प्रशंसनीय कामाबद्दल ठाऊक होतं.

ती आता आदर्श बनली होती.

फ्लोरेन्सला मात्र महान आदर्श अशी भूमिका नको होती.

तिला लग्नही करायचं नव्हतं.

सैनिकांना मदत करत रहाणं हेच काम तिला करायचं होतं.



स्कुटारीमधल्या परिश्रमांमुळे ती खूप आजारी पडली.

ब-याचदा तिला तिच्या खोलीबाहेर सुध्दा पडता येत नसे.

पण तरीही इस्पितळांचं कामकाज नीट चालावं यासाठी ती प्रयत्न करु शकत होती.

सरकारला आपल्या कल्पना आणि मिळवलेले अहवाल कळवायला

ती पत्रं पाठवत होती.

ती मीटींग्ज घेत होती.

काहीवेळा ती दिवसातले २२ तास काम करायची.

फ्लोरेन्सनं १८६० मध्ये नर्सिंग शिकवणारी शाळा सुरु केली.

तिथले विद्यार्थी लंडनमधल्या एका इस्पितळात एकत्र रहायचे.

आजारपणामुळे फ्लोरेन्स स्वत: त्यांना शिकवू शकत नव्हती.

पण ती त्यांना पत्रं लिहायची आणि कधीतरी इस्पितळाला भेट द्यायची.

आपल्या शाळेतल्या नर्सेस जगभरातल्या इस्पितळांमध्ये कामाला जातात याचा तिला अभिमान वाटायचा.

अशी खूप वर्षं गेली. फ्लोरेन्स काम करतच होती.

तिच्या कष्टांमुळे लष्करात आणि इंग्लडची वसाहत असलेल्या भारतात आरोग्याबद्दल काळजी घेणं वाढलं.

१८९३ मध्ये फ्लोरेन्स ७३ वर्षांची झाली.

अखेरीस तिनं विश्रांती घ्यायला सुरुवात केली.

अर्थात, अधूनमधून ती काम करत असे.

पण आयुष्यात मागे वळून पहाताना आपण किती चांगलं काम केलं ते तिला दिसत होतं.

लहानपणी, खूप चैन करणं तिला चुकीचं वाटायचं.

आता ती पुस्तकं वाचायची आणि आलेल्या पाहुण्यांना भेटायची.

ती तिच्या पाळलेल्या मांजरांबरोबर खेळायची.

अनेक वर्षं कष्ट केल्यानंतर फ्लोरेन्स नाईटिंगेल आता थोडंफार एंजॉय करु शकत होती.





अखेरचे चार शब्द

फ्लोरेन्स वयाच्या नव्वदाव्या वर्षी १९१० मध्ये मरण पावली. तिनं आपल्यामागे स्वच्छ, सुरक्षित इस्पितळांचा वारसा ठेवला, जिथे रुग्णांसाठी प्रशिक्षित नर्सेसची महत्वाची भूमिका होती. कित्येक देशांमधल्या इस्पितळांनी तिच्या पध्दती अवलंबल्या. याचा परिणाम म्हणजे हजारो जणांचे जीव वाचले.

फ्लोरेन्सनं महिलांसाठी समाजात एक महत्वाचा बदलही घडवून आणला. तिनं कामाला सुरुवात केली, तेव्हा महिलांसमोर उपजीविकेची फारशी साधनं नव्हती. ज्या नर्सिंगचं प्रशिक्षण घ्यायच्या त्यांना, नाईटिंगेल कुटुंबियांच्या म्हणण्याप्रमाणे, लोकलज्जेला आमंत्रण द्यावं लागायचं. मात्र क्रिमिअन युध्दातल्या तिच्या यशानंतर, नर्सिंग या व्यवसायाकडे लोक आदरानं पाहू लागले. फ्लोरेन्सनं शाळा सुरु केली तेव्हा तिच्यासारखं स्वप्न पहाणा-या स्त्रियांसाठी तिनं नवीन मार्ग खुला केला.

ऐषोआरामाचं आयुष्य व्यतीत करणं फ्लोरेन्स नाईटिंगेलला सोपं होतं. पण त्याऐवजी, तिला जे करावंसं वाटत होतं ते तिनं केलं, इतरांना मदत करण्यात आयुष्य घालवलं. तिची जिद्द जगासमोर प्रेरणादायी ठरली.

महत्वाच्या तारखा

१८२० – फ्लोरेन्स नाईटिंगेलचा १२ मे रोजी इटलीत जन्म.

१८२१ - कुटुंबियांबरोबर इंग्लंडला प्रस्थान

१८३७ – लोकांना मदत करण्याबद्दलचा तिच्या म्हणण्यानुसार देवाचा आवाज ऐकला.

१८४५ – नर्सिंग शिकण्याची तिची मागणी कुटुंबियांनी धुड़कावली

१८५० – कैसरवर्थला जर्मनीत जाऊन भेट.

१८५१ – कैसरवर्थला प्रशिक्षणासाठी परत रवाना

१८५३ – महिलांचं इस्पितळ चालवण्याचं पहिलं काम सुरु केलं

१८५४ – स्कुटारी, तुर्कस्तानला क्रिमिअन युध्दातल्या सैनिकांना नर्सिंग देण्यासाठी महिला नर्सच्या गटाचं नेतृत्व केलं.

१८५६ – इंग्लंडला परतली; इस्पितळं सुधारण्यासाठी प्रयत्न सुरु

१८६० – नर्सेससाठी नाईटिंगेल ट्रेनिंग स्कूलची लंडनमध्ये स्थापना.

१९१० – १३ आॉगस्टला लंडन, इंग्लंड येथे मृत्यू.

